(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# नवीन विश्वरचनेत भारताचे स्थान व भूमिका : एक अभ्यास

**डॉ. दत्तात्रय सौदागर सावंत** सहा. प्राध्यापक,राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

Email – dssawant1985@gmail.com

---

**प्रास्ताविक -**

आंतरराष्ट्रीय राजकारण सध्या अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. जागतिक पातळीवर गेल्या दोन-तीन दशकाचा विचार करता संघर्षाचे प्रमाण अधिकाधिक वाढत आहे. उदा. भारत - पाकिस्तान - चीन संघर्ष, रशिया - युक्रेन संघर्ष, सीमापार दहशतवाद, इंडो - पॅसिफिक प्रदेशातील वाढता तणाव, इस्त्रायल - पॅलेस्टाईन संघर्ष आणि इराण - अमेरिका संघर्ष इत्यादी. सध्या जग अशा या संघर्षपूर्ण वातावरणातून विनाशाकडे वाटचाल करीत आहे. परंतु जगाला संघर्षाऐवजी शांततेची आवश्यकता आहे. जागतिक पातळीवर आज कोणतेही राष्ट्र एकाकी राहू शकत नाही ते स्वयंपूर्ण नाही. त्यांना इतर राष्ट्रांची विविध बाबतीत आवश्यकता आहे. आज जगाचा जो वैज्ञानिक, तांत्रिक विकास झालेला आहे तो राष्ट्रांराष्ट्रांच्या सहकार्यातूनच झाला आहे. त्यामुळे संघर्षाऐवजी शांततेच्या धोरणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून भारत जागतिक पातळीवर शांतता निर्मितीचे कार्य करताना दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण प्रादेशिक अखंडता, राष्ट्रांचे सार्वभौमत्व जोपासणारे, बहु केंद्रीय लोकशाही आणि जागतिक शांततेला प्राधान्य देणारेच राहिले आहे. जागतिक संघर्षावर किंवा राष्ट्राराष्ट्रातील शत्रुत्वावर तोडगा काढण्यासाठी दहशतवादासारख्या जागतिक समस्यास तोंड देण्यासाठी भारत नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे. तर सद्यकाळामध्ये भारताचे भौगोलिक स्थान व सामरिक महत्त्व, येथील लोकशाही शासनव्यवस्था, लष्करी सुधारणा, वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती आणि अणुऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरी या सर्व गोष्टीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताचे महत्त्व वाढत आहे. थोडक्यात आजच्या नवीन बहुधृवीय विश्वरचनेमध्ये भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्या दृष्टिकोनातून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अभ्यास करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

**कीवर्ड -** आंतरराष्ट्रीय राजकारण, परराष्ट्र धोरण, बहुध्रुवीय विश्वरचना, दहशतवाद, जागतिक सत्ता, नेतृत्व.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे -**

१. नवीन विश्वरचना अभ्यासणे
२. नवीन विश्वरचनेत भारताचे स्थान व भूमिका अभ्यासणे.
३. सद्यकाळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

**विश्वरचनेचा मागोवा -**

विश्वरचनेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध अभ्यासकांनी केला आहे. त्यातून जागतिक रचना कशा पद्धतीची आहे ? याबद्दल विवेचन झाले आहे. प्रामुख्याने 1945 पर्यंतचा सत्ता संतुलनाचा काळ, 1945 ते 1991 शीतयुद्धाचा किंवा द्विध्रुवीय सत्ता समतोलाचा काळ, 1991 ते 2008 एकध्रुवीय सत्तेचा काळ आणि 2009 नंतर बहुध्रुवीय रचनेचा काळ अशा विविध भागांमध्ये विश्वरचनेचे वर्गीकरण केले जाते. प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत सत्ता संतुलनाचा काळ होता. पहिल्या महायुद्धानंतर 10 जानेवारी 1920 मध्ये राष्ट्र संघ स्थापन झाला व त्याद्वारे सत्तेचे संतुलन साधण्याचा प्रयत्न केला गेला. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर 24 ऑक्टोबर 1945 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. तेव्हा विश्वरचना दोन गटांमध्ये विभागल्याचे दिसते. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली भांडवलवादी राष्ट्रांचा गट तर सोवियत युनियनच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राष्ट्रांचा गट तयार झाला. म्हणजे अमेरिका व सोवियत युनियन हे सत्तेचे दोन ध्रुव तयार झाले. थोडक्यात नवीन विश्वरचना ही द्विध्रुवीय झाली. पुढे 1991 मध्ये सोवियत युनियनचे विघटन होऊन 15 स्वतंत्र राष्ट्रे तयार झाली. परिणामी अमेरिका ही एकमेव महासत्ता म्हणून पुढे आली. 1991 पासून 2008 पर्यंत अमेरिकेचे वर्चस्व कायम राहिले आणि आजही काही क्षेत्रांमध्ये अमेरिकेचे वर्चस्व कायम आहे. असे असले तरी 2008 नंतर विविध राष्ट्राकडून अमेरिकेच्या वर्चस्वाला धक्का देण्याचे प्रयत्न सुरू झाले. उदा. अमेरिकेच्या नाविक लष्करी तळावरती हल्ले करण्यात आले. अमेरिकेच्या हस्तक्षेपवादी धोरणास विविध राष्ट्रांकडून विरोध होऊ लागला. त्यामुळे लष्करी सत्तेबरोबरच आर्थिक व्यापारी सत्तेला महत्त्व प्राप्त झाले. त्यातून अमेरिकेचे वर्चस्व हळूहळू कमी होत राहिले. तर दुसरीकडे चीन, रशिया,

भारत आणि युरोपियन युनियन सारखा संघ प्रभावी शक्ती म्हणून उदयास आले. थोडक्यात सत्तेचे अनेक ध्रुव निर्माण झाले. परिणामी या काळातील विश्वरचना बहुध्रुवीय व्यवस्था म्हणून ओळखली गेली.

**नवीन विश्वरचनेचा उदय -**

2008 नंतर नवीन विश्वरचनेचा उदय होत गेला. प्रामुख्याने चीन, भारत, रशिया, युरोपियन युनियन, जपान, जर्मनी, फ्रांस आणि ब्राझील अशी अनेक राष्ट्रे व बहुराष्ट्रीय कंपन्या यांनी आर्थिक व व्यापारी क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती केल्याने जागतिक रचना विविध भागांमध्ये विभागली गेली. परिणामी या रचनेला बहुध्रुवीय रचना म्हणून ओळखले गेले.

**नवीन विश्वरचनेची वैशिष्ट्ये -**

नवीन विश्वरचनेमध्ये बहुध्रुवियता, आर्थिक किंवा व्यापारी क्षमता, सुरक्षा धोरणातील निर्णयाबाबतचे स्वातंत्र्य, वैज्ञानिक व तांत्रिक वर्चस्व आणि अणुऊर्जा क्षेत्रातील वर्चस्व अशी अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहेत.

**१. बहुध्रुवियता -**

नवीन विश्वरचनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जग बहुध्रुवीय झाले आहे. विविध विचारवंतांनी जागतिक विश्वरचनेचे वर्गीकरण करताना जगाची विभागणी तीन भागांमध्ये केली. एक म्हणजे अमेरिका व तिचे मित्र देश, दोन चीन व रशिया यांचा गट, तीन भारत व ग्लोबल साउथ राष्ट्रांचा गट या तीन भागांमध्ये सत्तेचे ध्रुवीकरण झाले आहे. त्यामुळे जग बहुध्रुवीय झाले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासकांच्या मते, अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स, जपान व भारत या राष्ट्रांबरोबरच युरोपियन युनियन व G20 या संघटनानी जागतिक राजकारणामध्ये आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. त्यामुळे ते सत्तेचा ध्रुव बनले आहेत. तर काहींच्या मते, अमेरिका, रशिया, जपान व चीन हे सत्तेचे अक्ष म्हणून काम पाहत आहेत, त्यामुळे नवीन विश्वरचनेचे बहुध्रुवीयता हे वैशिष्ट्य दिसते.

**२. आर्थिक किंवा व्यापारी जागतिकीकरण -**

नवीन विश्वरचनेचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आर्थिक जागतिकीकरण होय. या नवीन विश्वरचनेमध्ये बहुतांश राष्ट्रे आर्थिक जागतिकीकरणाच्या माध्यमातून आपला प्रभाव पाडत आहेत. तर जागतिकीकरणामुळे व्यापारावरील मर्यादा / निर्बंध कमी झाले आहेत. परिणामी राष्ट्राराष्ट्रातील व्यापार वाढण्यास मदत झाली. तसेच भांडवलाचा मुक्त प्रवाह राहिल्यामुळे आर्थिक किंवा व्यापारी मक्तेदारी निर्माण होऊ लागली. चीन, रशिया किंवा ओपेकसारखी संघटना यामध्ये प्रभावी होऊ लागली आहे. सध्या तेलावरून सत्तेचा ध्रुव ओपेककडे जाताना दिसतो आहे. म्हणजेच आर्थिक जागतिकीकरण हे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य दिसते.

**३. सुरक्षा धोरणातील नवेपणा -**

नवीन विश्वरचनेचे तिसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रांच्या सुरक्षा धोरणामध्ये झालेला बदल होय. द्विध्रुवीय सत्ता समतोलामध्ये नाटो या लष्करी संघटनेने आपला प्रभाव पाडला होता. परंतु सध्याच्या नवीन विश्वरचनेमध्ये नाटो आणि विविध लष्करी करारांचे महत्त्व कमी होत चालले आहे. शिवाय प्रत्येक राष्ट्र सुरक्षेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न करत आहे. प्रत्येक राष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये संरक्षणावरील खर्च वाढताना दिसत आहे. शिवाय विविध राष्ट्रे अण्वस्त्रधारी राष्ट्राबरोबर हात मिळवणी करीत आहेत. परिणामी नवीन सुरक्षा समीकरणे तयार होताना दिसत आहेत. थोडक्यात राष्ट्रांच्या सुरक्षा धोरणात नवेपणा आलेला दिसतो.

**४. तंत्रज्ञानाचे वर्चस्व -**

सद्यकाळात न्यू एमर्जिंग अँड स्ट्रॅटेजिक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून राष्ट्रे आपला विकास घडवून आणत आहेत. सद्यकाळात जागतिक राजकारणात तंत्रज्ञानाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्व संरक्षणविषयक धोरणे, व्यापार, अर्थव्यवस्था, आरोग्यव्यवस्था, अणुउर्जा आणि राजकीय व्यवहारांमध्ये तंत्रज्ञानाची प्रगती मार्गदर्शक ठरत आहे. विशेषतः अणुऊर्जा क्षेत्रामध्ये प्रचंड सुधारित तंत्रज्ञान आले आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राचे हित व सुरक्षा या दोन्ही गोष्टींसाठी तंत्रज्ञान ही गरजेची बाब झाली आहे. या गरजेतून प्रत्येक राष्ट्राने तंत्रज्ञानाच्या विकासावर भर देऊन आपले धोरण राबवले आहेत. त्यातून जागतिक पातळीवर विविध सत्ता उदयाला येऊन नवीन विश्वरचनेमध्ये त्या प्रभाव पाडताना दिसत आहे.

**५. नवीन विश्वरचना व भारत -**

नवीन विश्वरचनेमध्ये भारताचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणामुळे नव्या विश्वरचनेमध्ये भारताला महत्त्वाचे स्थान मिळत आहे. परिणामी तो सॉफ्ट पॉवर म्हणून उदयाला येत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरणात अलिप्ततावादाचे तत्व स्वीकारले. तदनंतरच्या काळात राष्ट्रीय हित केंद्रस्थानी ठेवून विविध धोरणे राबवली गेली. गेल्या दोन दशकात महासत्ता म्हणून भारताचे परराष्ट्र धोरण राबवले जात आहे. भारतात राबवले गेलेले आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया यासारख्या अनेक उपक्रमांमधून भारताकडे आर्थिक सत्ता प्राप्त झाली आहे. या सर्व बाबींमुळे भारत नवीन विश्वरचनेमध्ये आपले स्थान निर्माण करताना दिसतो, त्याचे विवेचन पुढील प्रमाणे आहे.

**६. राष्ट्रीय शक्ती -**

भारताची लोकसंख्या जगात सर्वाधिक असून भारताचे भौगोलिक स्थान हे तीन बाजूने समुद्र व एका बाजूने भूप्रदेश असे वैविध्यपूर्ण आहे. परिणामी व्यापार व सुरक्षा या दोन्ही गोष्टीसाठी भौगोलिक स्थान महत्त्वाचे लाभले आहे. स्थलाकृती व हवामान चांगले लाभल्यामुळे उत्पादन क्षमता वाढताना दिसत आहे. तसेच सर्वाधिक लोकसंख्या व त्यात सर्वाधिक तरुण या गोष्टीमुळे कौशल्य प्राप्त लोकसंख्या बनवून भारत जागतिक राजकारणात आपली भूमिका मांडत आहे.

**७. नेतृत्व आणि गुणवत्ता -**

नवीन विश्वरचनेत भारताचे स्थान पाहता भारताकडे भक्कम नेतृत्व आणि लोकसंख्येत गुणवत्ता असल्याचे दिसते. भारताच्या राजकीय नेतृत्वाकडून आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये प्रभावी परराष्ट्र धोरणाची मांडणी होताना दिसत आहे. अमेरिका, रशिया व जपान या राष्ट्रांबरोबर सहकार्याचे संबंध विकसित करताना क़्वाड, ब्रिक्स, जी20 आणि युरोपियन युनियन यासारख्या संघटनांमध्ये सुद्धा सहकार्याची भूमिका भारत निभावत आहे. परस्परविरोधी राष्ट्रगटांमध्ये म्हणजे अमेरिका व ऑस्ट्रेलिया या दोन्ही राष्ट्राबरोबर भारत मित्रत्वाचे संबंध ठेवून आहे. म्हणजे जागतिक राजकारणात भारत विविध राष्ट्रांबरोबर मित्र म्हणून भूमिका बजावत आहे. यातून आंतरराष्ट्रीय कल्याणाला प्रोत्साहन मिळते. तर नेतृत्व आणि गुणवत्तेच्या माध्यमातून भारत विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर करताना दिसतो.

**८. नीतिमूल्य व राष्ट्रीय हित -**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे अवलोकन करता असे दिसते की, राष्ट्रहित या घटकाला भारतीय परराष्ट्र धोरणात प्राधान्य दिलेले आहे. तसेच परराष्ट्र धोरण राबवताना नीतीमूल्य जोपासण्यावर भारताने भर दिलेला दिसतो. उदा. इतर राष्ट्रांचे सार्वभौमत्व जोपासणे, पंचशील तत्वे. थोडक्यात राष्ट्रीय हित जोपासणे आणि त्यासाठी नीतिमत्ता व नैतिक मुल्ये पाळणे ही भूमिका भारताची राहिलेली दिसते.

**९. शांतता व संवादाला प्राधान्य -**

नवीन विश्वरचना भारत आपली भूमिका मांडत असताना संघर्ष थांबविण्यावर व संवाद साधण्यावर अधिकाधिक प्राधान्य देत आहे. मुलत: जागतिक शांतता प्रस्थापित होण्यासाठी भारत प्रयत्न करीत आहे.

**नवीन विश्वरचनेत भारताचे स्थान व भूमिका -**

नवीन विश्वरचनेत भारताचे स्थान महत्त्वाचे आहे. कारण 2008 मध्ये अमेरिका या एकधृवीय सत्तेला हादरा देणाऱ्या अनेक घटना घडल्या. उदा. अमेरिकेच्या लष्करी नाविक तळावरती हल्ला, व्यापारी क्षेत्रातील रशिया, चीन व फ्रान्सची झेप, जपान, ब्राझील सारख्या देशांची आर्थिक प्रगती, नाटोचे कमी होत चाललेले वर्चस्व या अनेक घटनामधून आपणास असे दिसते की, दहशतवाद ही प्रमुख समस्या जागतिक पातळीवर निर्माण झाली असून एकध्रुवीय सत्ता असणाऱ्या अमेरिकेला त्याला सामोरे जावे लागत आहे. याच धर्तीवर भारत दहशतवादाच्या विरोधात लढतो आहे. त्यामुळे दहशतवाद संपवण्यासाठी विविध राष्ट्रांनी भारताच्या समवेत जाणारी भूमिका घेतली. दुसऱ्या बाजूला भारताने रशियाबरोबरचे आपले संबंध दृढ करण्यास सुरुवात केली होती. तिसऱ्या बाजूला भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये 2008 सालीच अनुकरण झाला होता. शिवाय भारताने ब्रिक्सबरोबर संरक्षण व धोरणात्मक भागीदारी अधिक घट्ट करण्यास सुरुवात केली होती. या सर्व गोष्टींमधून नवीन विश्वरचनेमध्ये भारत प्रमुख राष्ट्र म्हणून पुढे येताना दिसते. त्यामुळे नव्या विश्वरचनेत भारताचे स्थान महत्त्वाचे आहे. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहेत.

**१. भारत आर्थिक शक्ती.**

नवीन विश्वरचनेमध्ये भारताचा जागतिक अर्थव्यवस्थेमधला वाटा वाढत चालला आहे. भारत जगातील अर्थव्यवस्थांमध्ये चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. तर जीडीपीचा विचारकरता भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो.

जी 20 च्या संदर्भामध्ये विचारकरता भारत व 22 अरबराष्ट्रांमधील व्यापार हा 240 अब्ज डॉलर पेक्षा जास्त आहे. याच बाबतीत अमेरिकेची तुलना करता असे दिसते की, अमेरिकेचा या २२ अरबराष्ट्रांमधील व्यापार हा 141 अब्ज डॉलर इतका आहे. थोडक्यात भारत आर्थिक महासत्ता म्हणून नवीन विश्वरचनेमध्ये भूमिका पार पाडताना दिसतो आहे.

**२. जागतिक मित्र म्हणून भूमिका -**

नवीन विश्वरचनेमध्ये भारत जगातील बहुतांश राष्ट्रांचा मित्र म्हणून भूमिका पार पाडत आहे. दोन परस्परविरोधी राष्ट्रांमध्ये सुद्धा भारत मित्र म्हणून आपली भूमिका पार पाडत आहे. भारताने अमेरिकेबरोबरचे संबंध सुरळीत ठेवत असताना अमेरिकाविरोधी भूमिका असलेल्या रशिया, आस्ट्रेलिया, जपान, फ्रान्स व चीनबरोबर आपले धोरण सुरळीत किंवा मित्रत्वाचे ठेवले आहेत. तर दुसऱ्या बाजूला जागतिक पातळीवरील विविध प्रादेशिक आर्थिक संघटनांबरोबरही आपले संबंध मित्रत्वाचे ठेवले आहेत. उदा. ब्रिक्स, क़्वाड, एससीओ, ब्रिक्स व जी20 अशा विविध संघटनांमधून भारताने प्रतिनिधित्व करताना मित्रत्वाचे संबंध ठेवून राष्ट्रहित जोपासले आहे.

**३. औद्योगिक व तंत्रज्ञानाची उदयोन्मुख बाजारपेठ आणि लष्करी ताकद -**

सद्यकाळात भारत औद्योगिक क्षेत्रातील व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील उदयोन्मुख बाजारपेठ म्हणून पुढे येत आहे. तसेच सध्या नवीन विश्वरचनेत भारत लष्करीदृष्ट्या शक्तिशाली राष्ट्र म्हणून पुढे येत आहे. सध्या जागतिक व्यवस्थेमध्ये लष्करी सामर्थ्याचा विचार करता भारत चौथ्या क्रमांकावरती, तर सध्या भारत 75 बिलियन यूएस डॉलर हा संरक्षण क्षेत्रावरती खर्च करतो. तर एकूण सैन्यव्यवस्थेमध्ये 51 लाख 37 हजार इतकी सैन्यव्यवस्था असून त्यापैकी 14 लाख 55 हजार 550 कार्यरत सैनिक भारताकडे आहेत. तर आज भारत विविध क्षेपणास्त्रे तयार करून त्याची विक्री करत आहे. नुकतेच फिलिपाईन्सने भारताकडून ब्राह्मोस मिसाईल खरेदी केले आहे. तर व्हिएतनामबरोबर खरेदीसाठी चर्चा सुरू आहे.

**४. सॉफ्ट पॉवर -**

नवीन विश्वरचनेमध्ये भारताचे स्थान महत्त्वाचे आहे. कारण भारत सॉफ्ट पॉवर म्हणून उदयाला आला आहे. योग, आयुर्वेद, बॉलीवूड, संस्कृती, लोकशाही मूल्ये, पर्यटन, आरोग्य, शिक्षण प्रसार आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये भारताने केलेल्या प्रगतीमुळे भारत आज सॉफ्ट पॉवर म्हणून उदयास आला आहे. सध्या भारत जगातील पहिला आणि सर्वात मोठा डिजिटल लोकशाही म्हणून उदयाला आलेला देश आहे. तर भारताचा हिंदी महासागरावर मोठा प्रभाव असून भारताची प्रतिमा स्वच्छ निर्माण झाली आहे. उदा. कोविड काळामध्ये भारताने जवळपास 70 देशांना लसी देण्याचा उपक्रम राबविला. शिवाय शेजारी राष्ट्रावर आलेल्या संकटाच्या निवारणासाठी चीनने कर्जरूपाने रक्कम देऊ केली. परंतु भारताने मदत म्हणून रक्कम प्रदान केली. उदा. इंडोनेशियातील भूकंपावेळी केलेली मदत, मालदीवमधील पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवणे, दक्षिण सुदान व येमेन येथील यादवी युद्धातील नागरिकांची सुटका, रशिया – युक्रेन युद्धात ऑपरेशन गंगाअंतर्गत भारतीय विद्यार्थी व नागरिकांची सुटका इत्यादी. त्यामुळे आशिया आणि जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा समान संधी प्रदान करणारा देश म्हणून पुढे आली आहे.

एकूणच नवीन विश्वरचनेत भारताची भूमिका अशा पद्धतीची राहिली आहे. तर भारताचे शेजारी प्रथम हे धोरण नव्या विश्वरचनेत महत्त्वाचे ठरत आहे. सागरी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून भारताने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. तसेच भारताचे इंडो पॅसिफिकबद्दलचे धोरण, अमेरिकेच्या एकाधिकारशाही विरोधात घेतलेली भूमिका. यातून भारत विविध पातळीवरती आपले संबंध जोपासताना दिसतो आहे. तर अमेरिकेबरोबर संरक्षण, तंत्रज्ञान व व्यापार क्षेत्रामध्ये सहकार्याचे धोरण, रशियाबरोबर पारंपारिक संरक्षणाच्या भागीदार म्हणूनचे धोरण, चीनबरोबरची आर्थिक स्पर्धा, पाकिस्तान बरोबरचा काश्मीर विवाद आणि दहशतवादाला संपविण्याचा प्रश्न, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्याबरोबर इंडो पॅसिफिक धोरणाअंतर्गत सहकार्य अशा अनेक मुद्द्यांमुळे भारत नवीन विश्वरचनेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.

**मूल्यमापन -**

नवीन विश्वचना ही बहुध्रुवी असून सत्तेचे अमेरिका, रशिया, भारत, चीन, जपान, ब्रिक्स आणि G20 असे सत्तेचे अनेक ध्रुव तयार झालेले आहेत. या सर्वांमध्ये भारताचे स्थान महत्त्वाचे आहे. ते महत्त्वाचे होण्यापाठीमागे भारतामध्ये राबवले गेलेले मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत आणि डिजिटल कौशल्य निर्मितीचे उपक्रम महत्त्वाचे ठरले आहे. तर जागतिक पातळीवरील व्यवहारासाठी आवश्यक कौशल्य भारतीय नागरिकांमध्ये निर्माण निर्माण केल्यामुळे भारताचे जागतिक पातळीवरील स्थान महत्त्वाचे होत आहे. तर विविध आर्थिक संघटनांमध्ये भारताची भूमिका महत्त्वाची

असल्यामुळे नवीन विश्वरचनेत भारताचे स्थान मजबूत होत आहे. शिवाय भारतात राबवलेल्या आर्थिक धोरणामुळे, भारताने राबवलेल्या नेबर फर्स्ट पॉलिसीमुळे व भारताने शेजारी राष्ट्रांना आर्थिक संकटात मदत केल्यामुळे भारताचे स्थान अत्यंत महत्त्वाचे निर्माण झाले आहे.

नवीन विश्वरचनेमध्ये भारत प्रामुख्याने आपले परराष्ट्र धोरण व भूमिका स्वतंत्रपणे मांडत आहे आपले धोरण स्वतंत्र ठेवताना कोणत्याही राष्ट्राच्या दबावाला तो बळी पडता निर्णयातील स्वायत्तता पाळली गेली आहे असे दिसते. असे असले तरीही जागतिक पातळीवरील समविचारी राष्ट्रांशी भारताने मजबूत भागीदारी करणे पोषक व आवश्यक वाटते.

**संदर्भग्रंथ -**

1) Dr. Arshad, (20 May 2025), Ideas of the Emerging New World Order : A Critical Appraisal, Indian Council of World Affairs, New Delhi.
2) Kissinger, H. (2014), World Order : Reflections on the Character of Nations and the Course of History, United Kingdom, Penguin Books Limited.
3) Sorensen, G. (2016), Rethinking the New World Order, United Kingdom : Bloomsbury Publishing.
4) Acharya, A. (2014), The End of American World Order, Germany : Polity Press.
5) Acharya, A. (2023), Before the nation - state : Civilizations, world orders and the origins of global international relations, The Chinese Journal of International Politics, 16(3), (Autumn Issue)